महाराष्ट्र टाईम्स - 18 जाने 2019

# ‘महिलांना आत्मभान देण्याची गरज’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर




ताराराणी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा भद्रकाली ताराराणी पुरस्कार महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या नीलिमा मिश्रा यांना प्रदान करताना सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील. डावीकडून एस. एन. पोवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील आदी

‘समाजातील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे अनेक पर्याय आहेत. स्त्री सबलीकरण या क्षेत्रात काम करताना याची प्रकर्षाने जाणीव झाली. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी केवळ त्यांना दिशा देण्याची गरज असते. अशी दिशा देणारी समाजव्यवस्था आपल्याकडे नाही हे जाणवल्यामुळेच महिलांना आत्मभान देण्यासाठी पहिलं पाऊल टाकलं. महिलांच्या साथीनेच या पुरस्कारापर्यंतचा प्रवास सुकर झाल्याची भावना ग्रामीण विकास व महिला सक्षमीकरण क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या निलिमा मिश्रा यांनी व्यक्त केली.

ताराराणी विद्यापीठाच्यावतीने डॉ.व्ही. टी. पाटील यांच्या २४ व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून भद्रकाली ताराराणी पुरस्कार पद्मश्री निलिमा मिश्रा यांना सिक्किमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कारानंतर अनुभवकथन करत मिश्रा यांनी संवाद साधला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र आणि रोख ५१ हजार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

निलिमा मिश्रा म्हणाल्या, ‘ग्रामीण महिलांमध्ये कष्ट करण्याची ताकद व संयम असतो. मात्र अहोरात्र झटणाऱ्या या महिलांच्या चेहऱ्यावर कामाचे समाधान दिसत नाही. त्यांनी केलेल्या कामाचा पैसा त्यांच्या हातात खेळत नाही. त्यामुळे आत्मविश्वासापासून त्या दूरच राहतात. महिला सक्षमीकरण या शब्दाचा नेमका अर्थ माहिती नसताना मला महिलांना कष्टाच्या रहाटगाडग्यातून बाहेर काढायचं इतकच माहित होतं. वयाच्या तेराव्या वर्षी जेंव्हा या क्षेत्रात काम करावे यावर माझे मत ठाम झाले तेव्हा अविवाहित राहण्याचा

## नीलिमा मिश्रा यांचा भद्रकाली ताराराणी पुरस्काराने गौरव

निर्णय घेतला आणि त्यानंतर गावातील महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामापासून ध्येयाला सुरूवात केली. सरकारचा एकही पैसा न घेता महिलांना स्वावलंबी बनवले याचा आनंद आहे. गोधडी निर्मिती केली. एका परदेशी मैत्रिणीच्या मदतीने परदेशात गोधड्या पाठवल्या. महिलांना हुरूप आला. सुरूवातीला पापडच्या स्टॉलवर उभ्या राहण्यासाठी तयार नसलेल्या ग्रामीण महिला आज महाराष्ट्रभर रेडिमेड ड्रेस, गोधड्या, भरतकामाच्या वस्तू यांचे मार्केटिंग करतात.’

‘मिश्रा यांनी विकासाचा प्रश्न केवळ आपल्यापुरता सिमित न ठेवता दुष्काळी भागातील महिलांना स्वावलंबनाचे महत्व पटवले. बचतगटाच्या माध्यमातून अर्थिक, वैचारिक स्थैर्य दिले. उंबरठ्याबाहेरही न येणाऱ्या महिलांना परदेशातही मालाचे मार्केटिंग करण्याचा आत्मविश्वास देणाऱ्या निलिमा मिश्रांचा हा पुरस्कार स्त्री सबलीकरणाचा खरा गौरव असल्याचे मत श्रीनिवास पाटील यांनी व्यक्त केले. स्वागत डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. एस.डी. चव्हाण यांनी गौरवपत्राचे वाचन केले. सूत्रसंचालन एस.डी. चव्हाण आणि पी.आर. मंडलिक यांनी केले. यावेळी विश्वस्त एस. एन पवार, प्रकाश हिलगे, प्राजक्त पाटील, विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील आदी उपस्थित होते.

18 जाने. 19

## पुरस्काराने दिली नवी उमेद

‘आमच्या संस्थेच्या तिसऱ्या टप्प्यातील ९ वर्षांच्या कामाचे नियोजन करताना एक प्रकारची मरगळ आली होती. शेतकऱ्यांचे प्रश्न, सुविधा, महिला उद्योगाच्या व्याप्तीसाठी मुलभूत गरज पूर्ण करण्यासाठी काय करता येईल हा विचार पुढे होता. पण भद्रकाली ताराराणी पुरस्कारामुळे माझ्या मनात कामाची नवी उमेद जागी झाल्याची भावना मिश्रा यांनी यावेळी व्यक्त केली.

Scanned by CamScanner